सत्यमेव जयते

● जानेवारी २०१८ ● वर्ष : तिसरे ● अंक : पहिला

# निवडणूक वार्ता

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र




(१ जुलै २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंतचा संक्षिप्त आढावा)



राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठात नोव्हेंबर २०१७ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. परिषदेच्या उद्घाटन समारंभात राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते विविध पुस्तकाचे प्रकाशन झाले. छायाचित्रात डावीकडून श्री. अविनाश सणस, जगदीश मोरे, पिंपरी– चिंचवड महानगरपालिका आयुक्त श्रावण हार्डिकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, मा. राज्यपाल, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, बेंगळूरू येथील श्री. टी. आर. रघुनंदन, एडीआरचे विश्वस्त डॉ. अजित रानडे, अनिल वर्मा, श्री. संजय पाटील, श्रीमती प्रणाली घोंगे.

# लोकशाही, निवडणुका व सुशासनाबाबत विचारमंथन



नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ११ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या मतदानासाठी एका प्रभागात व्होटर्स व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेलचा (व्हीव्हीपॅट) प्रायोगिक तत्वावर वापर करण्यात आला. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने व राज्य शासनाच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठ आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेतर्फे २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन मुंबई विद्यापीठात करण्यात आले.

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत टप्प्याटप्प्याने व्हीव्हीपॅटचा वापर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. हे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात नव्हते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबाबत मात्र देशभरात विविध निवडणुकांच्या निमित्ताने आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर बरीच चर्चा रंगली. याच चर्चेच्या अनुषंगाने नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा प्रायोगिक तत्वार वापर करण्याचा निर्णय आयोगाने घेतला होता. व्हीव्हीपॅट वापरलेल्या मतदान केंद्रांवर कंट्रोल युनिटमधील मते आणि व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांद्वारे प्राप्त झालेल्या मतांची जुळलेली बेरीज; तसेच त्याबाबत कुठलीही तक्रार नसणे म्हणजे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बिनचूक असल्याची पावती आहे, असे म्हणणेच उचित ठरेल.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या संबंधित कलमामध्ये सुधारणा करण्यात आल्याने राज्यात प्रथमच सरपंचपदासाठी थेट निवडणुका घेण्यात आल्या. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या संबंधित कलमातही सुधारणा करण्यात आल्यामुळे आता नगरपरिषदांप्रमाणेच नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदासाठीदेखील थेट निवडणुका घेतल्या जात आहेत.

राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य शासन मंचतर्फे (सीएलजीएफ) माल्टाची राजधानी व्हॅलेटा येथे २० ते २४ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. तेथे आम्ही राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे व बुबनाळ ग्रामपंचायतीच्या यशोगाथेचे सादरीकरण केले. त्यास मिळालेली दाद निश्चितच हुरूप वाढविणारी आहे. एकूणच गेल्या सहामाहीत लोकशाही, निवडणुका आणि सुशासन याबाबत सखोल विचारमंथन झाले.

'निवडणूक वार्ता'च्या या अंकात या सर्व घटना-घडामोडींचा आढावा घेतला आहे. तो संदर्भाच्या दृष्टीने निश्चितच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

**ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

# निवडणूक वार्ता

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र



## मार्गदर्शन आणि संकल्पना

**श्री. ज. स. सहारिया**
**राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र**

## प्रबंध संपादक

**श्री. शेखर चन्ने**
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## संपादकीय मंडळ

| | |
|---|---|
| **श्री. अविनाश सणस**<br>प्रभारी उपायुक्त | **श्री. नि. ज. वागळे**<br>प्रभारी उपसचिव |
| **श्रीमती रीना फणसेकर**<br>अवर सचिव | **श्रीमती आरती सरवदे**<br>तहसीलदार |
| **श्रीमती मनीषा मोहिते**<br>तहसीलदार | **श्री. अतुल जाधव**<br>कक्ष अधिकारी |
| **श्रीमती रत्नप्रभा बेले**<br>कक्ष अधिकारी | **श्री. संजय सावंत**<br>कक्ष अधिकारी |
| **श्रीमती प्रणाली घोंगे**<br>सहायक आयुक्त | **श्रीमती मनीषा माने**<br>सांख्यिकी अधिकारी |

## संपादक

**श्री. जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी



- **प्रकाशक :** राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
- **प्रकाशन क्रमांक :** SEC/P.N.32/2018-1/Newsletter-5
- **मांडणी व मुद्रक :** कॉन्सेप्ट कम्युनिकेशन, मुंबई.
- **छायाचित्रे :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

निवडणूक वार्ता ही सहामाही गृहपत्रिका असून
ती खासगी वितरणासाठी आहे.





## अनुक्रमणिका


१) ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीनिमित्त राष्ट्रीय परिषद ........................................५

२) महानगरपालिका निवडणुकांचा मागोवा ........................................११

३) मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब ........................................१३

४) नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांचा मागोवा ........................................१९

५) सरपंचपदासाठी प्रथमच थेट निवडणूक ........................................२१

६) ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सुधारित खर्च मर्यादा ........................................२३

७) ठाणे जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक ........................................२४

८) आंतरराष्ट्रीय मंचाकडून कौतुक ........................................२६

# ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनिमित्त राष्ट्रीय परिषद

भारतीय राज्य घटनेत १९९२मध्ये करण्यात आलेल्या ७३ आणि ७४ व्या दुरुस्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठातील फिरोजशहा मेहता भवनात राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. '७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीची २५ वर्षे: प्रगती आणि भावी वाटचाल' हा परिषदेचा मुख्य विषय होता. मुंबई विद्यापीठ आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था परिषदेचे आयोजक होते. त्यासाठी राज्य शासनाचेही सहकार्य लाभले. या परिषदेची मूळ संकल्पना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांची होती.

## उद्‌घाटन समारंभ

मा. राज्यपाल सी. विद्यासागरराव यांच्या हस्ते २ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी १० वाजता परिषदेचे उद्‌घाटन झाले. ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे प्रमुख पाहुण्या होत्या. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी प्रास्ताविक केले. बेंगळूरू येथील अकौंटिबिलिटी इनिशिएटिव्हस्‌चे सल्लागार टी. आर. रघुनंदन यांचे यावेळी बीजभाषण झाले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## समारोप समारंभ

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ३ नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी ३.४५ वाजता परिषदेचा समारोप समारंभ पार पडला. श्री. सहारिया यांनी दोन दिवसांत झालेल्या विचारमंथनाबाबत यावेळी मनोगत व्यक्त केले. नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे संचालक डॉ. जॉर्ज मॅथ्यू यांचे समारोपाचे भाषण झाले. पुणे

## सक्षमीकरणासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण

"राज्य शासनाने विविध अधिकारांचे विकेंद्रीकरण करुन पंचायतराज संस्थांचे अधिक सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. अधिकार, निधी आणि साधनसामग्रीचे विकेंद्रीकरण केल्यास आपण विकसित भारत देशाचे स्वप्न लवकरात लवकर साकार करु. त्यासाठी पंचायतराज संस्थांकडे अधिकार हस्तांतरणासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला पाहिजे."

**–सी. विद्यासागर राव,**
राज्यपाल



# प्रत्येक जिल्ह्यांत प्रशिक्षण संस्था

घटनेतील ७३ व ७४ व्या दुरुस्तीच्या रौप्य महोत्सवानिमित्त पहिल्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्याचा उपक्रम अभिमानास्पद आहे. हे औचित्य साधून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींसाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात येईल. प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीतून निर्णय प्रक्रियेतील विकेंद्रीकरण यशस्वी होईल.

**-श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री



येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## विविध विषयांवर विचारमंथन

परिषदेत उद्‌घाटन आणि समारोपाशिवाय सहा वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्र झाली. त्यात निवडणूक सुधारणा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन विरुद्ध राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उल्लेखनीय कार्य, महिलांचा प्रभावी सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यप्रणाली, निधी व अधिकार आदी विषयांचा समावेश होता. देशभरातील नामवंत विचारवंतानी परिषदेत आपले विचार मांडले. या परिषदेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी/अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, अभ्यासक, विद्यार्थी इ. मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## परिषदेच्या आयोजनासाठी समित्या

राष्ट्रीय परिषदेचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यासाठी शिखर समिती आणि कार्यकारी समिती गठीत करण्यात आली होती. शिखर समितीत ग्रामविकास व नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या संचालकांचा समावेश होता. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने या समितीचे समन्वयक होते.

श्री. चन्ने यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीदेखील गठीत करण्यात आली होती. ग्रामविकास विभागाचे उपसचिव संजय बनकर, नगरविकास विभागाचे विशेष कार्याधिकारी ज. ना. पाटील, मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मृदुल निळे, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या प्रा. मानसी फडके, आरएससीडीचे

संचालक भीम रासकर, आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे आणि ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचे सदस्य होते. आयोगाच्या अवर सचिव रीना फणसेकर समितीच्या समन्वयक होत्या.

मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दिनेश कांबळे, एडीआरचे संस्थापक विश्वस्त डॉ. अजित रानडे आणि सीएलजीएफच्या अनुया कुवर, राज्यशास्त्र विभागाचे श्री. संजय पाटील यांचाही परिषदेच्या आयोजनात मोलाचा हातभार लाभला.




## आकर्षक प्रदर्शन आणि पुस्तकांचे प्रकाशन

राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने फिरोजशहा मेहता भवनात अत्यंत लक्षवेधी प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये, पंचायतराज संस्थांची वाटचाल, राज्य निवडणूक आयोगाचे विविध टप्पे अशा वेगवेगळ्या विषयांवर आधारीत हे प्रदर्शन होते. त्यासोबतच राज्य निवडणूक आयोग, यशदा, एडीआर आदींनी आपापल्या पुस्तकांची दालने सजवली होती. परिषदेचे उद्‌घाटन आणि समारोप समारंभात मान्यवरांच्या हस्ते विविध पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.



**राष्ट्रीय परिषदेच्या तयारीचा अंतिम आढावा घेताना राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया. डावीकडून श्री. सहारिया यांच्यानंतर मुंबई विद्यापीठाचे प्रा. मृदुल निळे, कुलसचिव डॉ. दिनेश कांबळे, आयोगाचे सचिव श्री. शेखर चन्ने.**

# राष्ट्रीय परिषदेत रंगली विविध चर्चासत्रे




'ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न व स्थानिक स्वराज्य संस्था विरुद्ध राज्य शासन' या चर्चासत्रात बोलताना मुंबई विद्यापीठाचे डॉ. चंद्रकांत पुरी, शेजारी आरएससीडीचे श्री. दत्ता गुरव, ग्रामविकास विभागाचे माजी सचिव श्री. सुधीर ठाकरे, ग्रामविकास व वित्त विभागाचे माजी प्रधान सचिव व्ही गिरिराज, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय समितीचे सदस्य श्री. चैत्राम पवार आणि कोलकता येथील डॉ. प्रभात दत्ता.

'नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न व राज्य शासन विरुद्ध स्थानिक स्वराज्य संस्था' या चर्चासत्रात बोलतना नवी दिल्ली येथील प्रा. ओ. पी. माथूर, उपस्थित आमदार श्री. अनिल सोले, माजी सनदी अधिकारी रमानाथ झा.






राष्ट्रीय परिषदेत विविध संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रा. गौतम गवळी या सत्राचे अध्यक्ष होते. शोधनिबंध सादर करताना डॉ. अनिरुद्ध प्रसाद सिंह. अन्य संशोधक डॉ. ए. स्टिफन, श्री. असीम मिश्रा, श्रीमती अरुणा साने.

'स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा प्रभावी सहभाग' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्रीमती प्रगती बाणखेले यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. उपस्थिती महिला राजसत्ता आंदोलनाच्या राज्य समन्वयक श्रीमती मालती सांगने, हिमाचल प्रदेशातील सामाजिक कार्यकर्ते श्री. सुभाष मेंढापूरकर, कोलकत्ता येथील सामाजिक शास्त्र अभ्यास केंद्रच्या डॉ. दयाबती रॉय आणि गुजरातमधील कला महिला विकास संघटनेच्या श्रीमती लता सचदे.



# राष्ट्रीय परिषदेत रंगली विविध चर्चासत्रे



‘नागरी स्थानिक स्वराज्य संस्था: अधिकार, निधी आणि सामग्रीचे विकेंद्रीकरण’ या चर्चासत्रात बोलताना मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त व नगरविकास विभागाचे माजी प्रधान सचिव श्री. जयराज फाटक. शेजारी धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. अनिल मुंदडा. सामाजिक कार्यकर्ते डॉ. जयेंद्र परुळेकर आणि संशोधक श्रीमती वर्षा विद्याविलास.





‘ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था: अधिकार, निधी आणि सामग्रीचे विकेंद्रीकरण’ या विषयावर डॉ. सुरेंद्र जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. यावेळी प्रा. प्रभाकर जाधव व प्रा. शिवाजी जाधव यांच्या ‘नांदेड – वाघाळा-२०१७’ या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. उपस्थित आमदार श्री. शिवाजीराव नाईक, पश्चिम बंगालचे डॉ. बी. पी. शाम रॉय, श्रमिक मुक्ती संघटनेच्या श्रीमती इंदवी तुळपुळे, डॉ. एम. गोपीनाथ रेड्डी.

‘देशविदेशादील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उल्लेखनीय कार्य ’या चर्चासत्रात बोलताना आरएससीडीचे संचालक श्री. भीम रासकर. शेजारी लखनौ येथील डॉ. पंचऋषीदेव शर्मा, मेजर जनरल (निवृत्त) श्री. अनिल वर्मा, सीएलजीएफच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती अनुया कुवर, फुलंब्री (जि. औरंगाबाद) येथील माजी सरपंच श्री. सुहास शिरसाठ आणि डॉ. टी. ब्रम्हानंदम त्रिगिरीपल्ली.







‘निवडणूक सुधारणा’ या चर्चासत्रात बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी. शेजारी. एडीआरचे प्रा. जगदीप चोकर आणि डॉ. अजित रानडे.




परिषदेसाठी सज्ज झालेले मुंबई विद्यापीठातील फिरोजशहा मेहता भवन.



परिषदेतील प्रदर्शनाची पाहणी करताना मा. मुख्यमंत्री यांच्यासह राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ग्रामविकास विभागाचे सचिव असीमकुमार गुप्ता आदी.

## परिषदेची क्षणचित्रे



प्रदर्शनाची पाहणी करताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. शेजारी श्री. सहारिया.



ग्रामपंचायत सदस्याच्या प्रशिक्षणासाठी 'आरएससीडी'ने तयार केलेल्या सापशिडीच्या खेळाची माहिती घेताना ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, श्री. सहारिया, श्री. सुमित पाटील, डॉ. मृदुल निळे.



परिषदेच्या उद्घाटन समारंभास उपस्थित मान्यवर.



परिषदेसाठी स्वयंसेवक म्हणून कार्यरत असलेले मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी. (छायाचित्रे : रोहण टिपे, मुंबई)

# महानगरपालिका निवडणुकांचा मागोवा



महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज कर्मचारी.

महानगरपालिका निवडणुकांच्या दृष्टीने सन २०१७ हे वर्ष अत्यंत महत्वाचे होते. या वर्षात एकूण १८ महानगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या. त्यातील मीरा- भाईंदर आणि नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुका दुसऱ्या सहामाहीत पार पडल्या. त्याचबरोबर नागपूर आणि पुणे महानगरपालिकेच्या प्रत्येकी एका; तर कोल्हापूर आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येकी दोन रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील या कालावधीत मतदान घेण्यात आले.

## मीरा- भाईंदर महानगरपालिका

मीरा- भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० ऑगस्ट २०१७ रोजी मतदान झाले. या महानगरपालिकेची मुदत २७ ऑगस्ट २०१७ रोजी संपणार होती. मीरा- भाईंदर महानगरपालिकेच्या एकूण २४ प्रभागातील ९५ जागांसाठी मतदान झाले. नामनिर्देशनपत्रे २६ जुलै ते २ ऑगस्ट २०१७ या कालावधीत दाखल करण्याची मुदत होती. ३ ऑगस्ट २०१७ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी झाली. २० ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले. आयोगाने ७० टक्क्यांपर्यंत मतदानाचे प्रमाण वाढविण्याचे लक्ष निर्धारित केले होते. त्यासाठी मोठ्याप्रमाणावर मतदार जागृती मोहीम राबविण्यात आली; परंतु मतदानाच्या दिवशी मीरा-भाईंदरसह मुंबई परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली. या मुसळधार पावसातही गेल्या निवडणुकीच्या तुलनेत अधिक म्हणजे ४७.७ टक्के मतदान झाले. सन २०१२ च्या निवडणुकीत ४६.९९ टक्के मतदान झाले होते. मतमोजणी २१ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १० वाजता झाली.


### मीरा-भाईंदर एक दृष्टिक्षेप



| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या<br>८,०९,३७८ | एकूण मतदार<br>५,९३,३३६ |
| एकूण प्रभाग<br>२४ | एकूण जागा<br>९५ (महिला-४८) |
| सर्वसाधारण<br>६४ (महिला-३२) | अनुसूचित जाती<br>४ (महिला-२) |
| अनुसूचित जमाती<br>१ (महिला-१) | नागरिकांचा मागास प्रवर्ग<br>२६ (महिला-१३) |

निवडणूक वार्ता
राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

## मीरा-भाईंदर महानगरपालिका निवडणूक निकाल




## नांदेड- वाघाळा महानगरपालिका


नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ११ ऑक्टोबर २०१७ रोजी मतदान झाले. या महानगरपालिकेची मुदत ३० ऑक्टोबर २०१७ रोजी संपणार होती. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याचा कालावधी १६ ते २३ सप्टेंबर २०१७ असा होता. नामनिर्देशनपत्रांची छाननी २५ सप्टेंबर २०१७ रोजी झाली. एकूण ६४.८२ टक्के मतदान झाले. आयोगाने मतदान जागृतीसाठी केलेल्या प्रयत्नांची ही फलश्रुती आहे. कारण गेल्या निवडणुकीच्या तुलनेत मतदानाच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ झाली. सन २०१२ च्या निवडणुकीत केवळ ५६.६२ टक्के मतदान झाले होते. मतदानाच्या दुसऱ्या दिवशी १२ ऑक्टोबर २०१७ रोजी मतमोजणी झाली.


## नांदेड- वाघाळा एक दृष्टिक्षेप



| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या<br>५,५०,४३९ | एकूण मतदार<br>३,९५,४८२ |
| एकूण प्रभाग<br>२० | एकूण जागा<br>८१ (महिला-४१) |
| सर्वसाधारण<br>४२ (महिला-२१) | अनुसूचित जाती<br>१५ (महिला-८) |
| अनुसूचित जमाती<br>२ (महिला-१) | नागरिकांचा मागास प्रवर्ग<br>२२ (महिला-११) |


## नांदेड- वाघाळा महानगरपालिका निवडणूक निकाल



मतदार यादीतील मतदारांच्या नावांची शोधमोहीम

# मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेवर शिक्कामोर्तब




नांदेड-वाघळा महानगरपालिका निवडणुकीसाठी सज्ज ईव्हीएम.

निवडणुका अधिकाधिक पारदर्शक व्हाव्यात म्हणूनच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि अलीकडच्या काळात 'व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल'ची (व्हीव्हीपॅट) संकल्पना समोर आली आहे. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट हे दोन स्वतंत्र यंत्रे आहेत. ईव्हीएमचा वापर बऱ्याच वर्षांपूर्वीच सुरू झाला आहे. व्हीव्हीपॅटचा वापर मात्र अलीकडेच सुरू झाला आहे. राज्य निवडणूक आयोगाने सन २००४ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ईव्हीएमचा वापर करायला सुरूवात केली आहे. नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या ऑक्टोबर २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत प्रायोगिक तत्वावर व्हीव्हीपॅटचा प्रथमच वापर करण्यात आला.

नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुकीत कंट्रोल युनिटवर नोंदविलेली मते व व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांद्वारे मिळालेल्या मतांची संख्या तंतोतंत जुळली. यावरून राज्य निवडणूक आयोगाकडील ईव्हीएममध्ये कुठलीही छेडछाड (टॅम्परप्रुफ) करता येत नाही व ते विश्वासार्ह असल्याचे सिद्ध झाले आहे.

## ईव्हीएमची पार्श्वभूमी

भारत निवडणूक आयोगाने सर्वप्रथम डिसेंबर १९७७ मध्ये नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा (ईव्हीएम) वापर करण्याची कल्पना मांडली. ते तयार करण्याची जबाबदारी हैद्राबाद येथील इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (इसीआयएल) या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीवर सोपविली. या कंपनीने सन १९७९ मध्ये नमुनादाखल ईव्हीएम विकसित केले. सर्व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना या यंत्राचे ६ ऑगस्ट १९८० रोजी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल) या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीलादेखील ईव्हीएम तयार करण्यास सांगण्यात आले.

## केरळमध्ये पहिला प्रयत्न

भारत निवडणूक आयोगाने केरळमधील पारूर विधानसभा मतदार संघातील ८४ पैकी ५० मतदार केंद्रामध्ये सर्वप्रथम इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा चाचणीच्या स्वरूपात १९ मे १९८२ रोजी वापर करण्याचा निर्णय घेतला. मतदानाच्या एक दिवस आधी एका उमेदवाराने मतदान यंत्राच्या वापराबाबत

प्रश्नचिन्ह उपस्थित करून केरळ उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक बघून त्याच्या वापराबाबत हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

निकालानंतर दुसऱ्या एका उमेदवाराने लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ आणि निवडणूक नियम १९६१ मधील तरतुदीनुसार मतदान यंत्रांचा वापर करता येत नसल्याचा दावा करत नवी याचिका दाखल केली; परंतु न्यायालयाने पुन्हा निवडणूक आयोगाच्या बाजूने निर्णय दिला. पुढे सर्वोच्च न्यायालयाने मात्र उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवत संबंधित ५० मतदान केंद्रांवर पारंपरिक पद्धतीने मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याचा आदेश दिला.

## लोकप्रतिनिधित्व अधिनियमात दुरूस्ती

न्यायालयीन प्रकरणानंतर भारत निवडणूक आयोगाने मतदान यंत्रांच्या वापराबाबत सबुरीचे धोरण स्वीकारले. संसदेने सन १९८८ मध्ये लोकप्रतिनिधित्व अधिनियम आणि निवडणूक नियमांमध्ये '६१ ए' चा समावेश करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापरास कायदेशीर अधिष्ठान दिले. यानंतर भारत निवडणूक आयोगाने सन १९९८ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत १६ मतदार संघांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर मतदान यंत्राचा वापर करण्याचा निर्णय घेतला. मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी पाच; तर दिल्लीतील सहा विधानसभा मतदार संघामध्ये या यंत्रांचा वापर करण्यात आला. सन २००४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रथमच एकाच वेळी संपूर्ण देशात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा यशस्वीरीत्या वापर करण्यात आला. तेव्हापासून देशातील सर्व लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान यंत्रांचा वापर केला जात आहे.

## 'स्थानिक स्वराज्य संस्थां'साठीही 'यंत्रे'

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा यशस्वीरीत्या सुरू झालेला वापर, लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगानेही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या यंत्रांचा वापर करण्याचा निर्णय घेतला. राज्यात सर्वप्रथम २८ नोव्हेंबर २००४ रोजी झालेल्या वर्धा, चंद्रपूर व कामठी नगरपरिषदेच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यात आला. त्यासाठी इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून ५० यंत्रे घेण्यात आली होती. त्यावेळी एका यंत्राची किंमत ८ हजार ६७० रुपये इतकी होती.

औरंगाबाद आणि नवी मुंबई महानगरपालिका; तसेच अंबरनाथ, बदलापूर, नवघर-माणिकपूर व नालासोपारा या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांत (१० एप्रिल २००५) प्रथमच पूर्णपणे मतदान यंत्राचा वापर करण्यात आला. त्याच दिवशी ४ विविध महानगरपालिका आणि १३ नगरपरिषदांच्या पोटनिवडणुकांदेखील मतदान यंत्राद्वारे घेण्यात आल्या. यासाठी एकूण २ हजार ५०० मतदान यंत्रे वापरण्यात आली होती. या यंत्रांकरिता एकूण १ कोटी ६५ लाख ३५ हजार २१६ रुपये खर्च आला होता. त्यात २ हजार ७०० बॅटरी व २ हजार ४५० मेमरींचाही समावेश होता.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यांत दुरुस्ती

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्यापूर्वी संबंधित कायद्यांत दुरूस्ती करण्यात आली होती. या दुरूस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली. औरंगाबाद आणि नवी मुंबई महानगरपालिका

## व्हीव्हीपॅट म्हणजे काय ?

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला ‘व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल’ नावाचे स्वतंत्र यंत्र जोडले जाते. याच यंत्राला व्हीव्हीपॅट असे म्हणतात. व्हीव्हीपॅट म्हणजे प्रामुख्याने एक पेटी असते. मतदान केल्यानंतर त्या पेटीला असलेल्या पारदर्शक काचेतून आपण कोणाला मतदान केले त्याची खात्री दर्शविणारी चिठ्ठी दिसते. काही सेकंदांनंतर ती चिठ्ठी कट होऊन त्या पेटीत खाली पडते. पेटीत अशाप्रकारे सर्व चिठ्ठ्या जमा होतात. गरज भासल्यास त्या चिठ्ठ्यांद्वारे मतमोजणीदेखील करता येते.




निवडणुकीनंतर सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुका मतदान यंत्राद्वारेच घेण्यात येऊ लागल्या.

### व्हीव्हीपॅटची पार्श्वभूमी

भारत निवडणूक आयोगाने ४ ऑक्टोबर २०१० रोजी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची एक बैठक आयोजित केली होती. सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी ईव्हीएमबाबत या बैठकीत समाधान व्यक्त केले होते; परंतु मतदान प्रक्रियेत आणखी पारदर्शकता आणण्यासाठी ‘व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल’चा (व्हीव्हीपॅट) वापर करण्यास सुरूवात करावी, अशी विनंती त्यांनी यावेळी केली.

भारत निवडणूक आयोगाने हा विषय ईव्हीएमसंदर्भातील तांत्रिक तज्ज्ञ समितीकडे अभ्यासासाठी आणि आवश्यक त्या शिफारसींकरिता सोपविला. या समितीने भेल, ईसीआयएल, राजकीय पक्ष आणि विविध संस्थांसोबत वारंवार चर्चा करून नमुनादाखल व्हीव्हीपॅट विकसित केले. त्याचे २०११ मध्ये प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. भारत निवडणूक आयोगाने जुलै २०११ मध्ये लडाख (जम्मू-काश्मीर), तिरूवनंतपुरम (केरळ), चेरापुंजी (मेघालय), पूर्व दिल्ली आणि जैसलमेर (राजस्थान) येथे जुलै २०११ मध्ये व्हीव्हीपॅटची क्षेत्रीय परीक्षण चाचणी घेतली. या चाचणीत विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, सिव्हिल सोसायटीचे सदस्य आणि संबंधित अभ्यासक सहभागी झाले होते.

### व्हीव्हीपॅटचे प्रथम क्षेत्रीय परीक्षण

भारत निवडणूक आयोगाने प्रथम क्षेत्रीय परीक्षण चाचणीनंतर व्हीव्हीपॅटचे विस्तृत पुन:रावलोकन केले. त्यानंतर व्हीव्हीपॅटचे दुसरे व्हर्जन (आवृत्ती) विकसित केले


गेले. त्याची पुन्हा जुलै–ऑगस्ट २०१२ मध्ये क्षेत्रीय परीक्षण चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक तज्ज्ञ समितीची १९ फेब्रुवारी २०१३ रोजी बैठक झाली. या बैठकीत व्हीव्हीपॅटला मान्यता देण्यात आली व त्याचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली. त्यानुसार केंद्र सरकारने १४ ऑगस्ट २०१३ रोजी संबंधित नियमात बदल केल्याने व्हीव्हीपॅटच्या वापराचा मार्ग मोकळा झाला.

तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रिया पार पाडल्यानंतर नागालँडमधील नोकसेन विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीत ४ सप्टेंबर २०१३ रोजी व्हीव्हीपॅटचा सर्वप्रथम वापर केला गेला. त्यानंतर झालेल्या विधानसभांच्या प्रत्येक निवडणुकांमध्ये निवडक मतदार संघात व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येऊ लागला. लोकसभेच्या २०१४ मधील सार्वजनिक निवडणुकांमध्ये ८ मतदारसंघांमध्ये व्हीव्हीपॅटचा वापर केला गेला. गोवा विधानसभेच्या २०१७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्व ४० मतदारसंघात व्हीव्हीपॅटचा वापर झाला.

दरम्यान, ईव्हीएमसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात विविध याचिका दाखल झाल्या होत्या. त्यातील एका प्रकरणात भारत निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी टप्प्याटप्प्याने व्हीव्हीपॅटचा (व्होटर व्हेरिफायबल पेपर ऑडिट ट्रेल) वापर करण्यास सुरूवात करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०१३ रोजी दिले.

## नांदेड– वाघाळामध्ये प्रथमच वापर

देशातील विविध विधानसभा आणि आपल्या राज्यातील फेब्रुवारी २०१७ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकानंतर व्हीव्हीपॅटचा वापर करण्याची मागणी होऊ लागली. त्याची दखल घेत लोकसभा आणि विधानसभा



**व्हीव्हीपॅटच्या पेटीमध्ये जमा होणाऱ्या चिठ्ठ्या.**

निवडणुकांच्या धर्तीवर नांदेड– वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत या यंत्राचा वापर करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने ४०० व्हीव्हीपॅट खरेदी तत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ईसीआयएल) या कंपनीला २० जुलै २०१७ रोजी कळविले होते.

राज्य शासनाने व्हीव्हीपॅटच्या खरेदीसाठी आयोगाच्या मागणीनुसार ८ सप्टेंबर २०१७ रोजी एकूण ९२ लाख रुपये उपलब्ध करून दिले. एका व्हीव्हीपॅटसाठी सुमारे २६ हजार २१२ रुपये खर्च अपेक्षित होता. यात व्हीव्हीपॅट यंत्रासह बॅटरी आणि प्रिंटींग पेपरचा समावेश होता. त्यानुसार ईसीआयएलने ४०० व्हीव्हीपॅट उपलब्ध करून देण्याचे मान्य केले होते; परंतु तांत्रिक अडचणीमुळे खरेदी तत्वावर व्हीव्हीपॅट पुरविण्यास ईसीआयएलने नंतर असमर्थता दर्शविली. मात्र या निवडणुकीत प्रायोगिक तत्वांवर काही व्हीव्हीपॅटच्या वापरास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी द्यावी, अशी विनंती ईसीआयएलने केली होती.

## प्रभाग क्र. २ ची निवड

ईसीआयएलच्या विनंतीचा सखोल विचार करुन नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एका प्रभागात हे व्हीव्हीपॅट प्रायोगिक तत्वावर वापरण्यास ईसीआयएलला परवानगी देण्याचा निर्णय आयोगाने घेतला. त्यानुसार ईसीआयएलने ७० व्हीव्हीपॅट २० सप्टेंबर २०१७ रोजी नांदेड महानगरपालिकेकडे पाठविले. व्हीव्हीपॅटच्या वापरासंदर्भात महानगरपालिका आयुक्तांनी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची व इतर मान्यवरांची बैठक २१ सप्टेंबर २०१७ रोजी घेतली. या बैठकीत सर्वांच्या उपस्थितीत सोडतीद्वारे प्रभाग क्रमांक २ ची व्हीव्हीपॅटचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यासाठी निवड केली.

नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या एकूण २० पैकी १९ प्रभाग चार सदस्यांचे आहेत. एक प्रभाग ५ सदस्यांचा आहे. महानगरपालिका क्षेत्रात एकूण ३ लाख ९६ हजार ८७२ मतदार असून त्यांच्यासाठी ५५० मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रभाग क्र.२ वगळता अन्य सर्व प्रभागांतील एका मतदान केंद्रावर सरासरी ७३४ मतदार होते. व्हीव्हीपॅटचा वापर होत असलेल्या प्रभाग क्र.२ मध्ये मतदारांची एकूण संख्या २० हजार ३०७ इतकी होती. त्यांच्यासाठी ३७ मतदान केंद्रांची व्यवस्था केली होती. या प्रभागात एका मतदान केंद्रावर सरासरी ५५० मतदार होते.

प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी १७ मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅट सुरू करण्यात अडचणी आल्या. त्यानंतर राखीव व्हीव्हीपॅट, कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटची अदलाबदल करून १७ पैकी १३ मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅटद्वारे मतदान प्रक्रिया सुरू करण्यात यश आले. मतदान केंद्र क्रमांक २/४, २/२७, २/२९ आणि २/३१ वर व्हीव्हीपॅटद्वारे मतदान प्रक्रिया सुरू होऊ शकली नाही;तसेच मतदान केंद्र क्रमांक २/२६ आणि २/३२ वर काही वेळाने व्हीव्हीपॅटची यंत्रणा बंद पडली. त्यामुळे तेथे नंतर व्हीव्हीपॅटशिवाय मतदान प्रक्रिया सुरू करण्यात आली. परिणामी एकूण सहा मतदान केंद्रांवर व्हीव्हीपॅटचा वापर करता आला नाही. इतर उर्वरित सर्व ३१ मतदान केंद्रांवर संपूर्ण मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. तेथील मतदारांना आपण दिलेल्या उमेदवारालाच किंवा पक्षालाच आपले मत जात असल्याची खात्री करणे शक्य झाल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

प्रभाग क्र. २ मध्ये एकूण २० हजार २६२ मतदार होते. त्यापैकी ११ हजार ९०७ जणांनी मतदान केले. प्रभागात ५९ टक्के मतदान झाले. संपूर्ण महानरपालिका क्षेत्रासाठी एकूण ६४.८२ टक्के मतदान झाले.

## दोन्हीप्रकारे मतमोजणी

व्हीव्हीपॅटचा वापर केलेल्या प्रभाग क्रमांक २ ची मतमोजणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली होती. त्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. समिती सदस्यांच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅटद्वारे प्राप्त चिठ्ठ्या व कंट्रोल युनिट या दोन्ही प्रकारे मतमोजणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र कंट्रोल युनिटद्वारे केल्या गेलेल्या मतमोजणीचा निकाल अंतिम असेल, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले होते. मतमोजणी प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने १२ ऑक्टोबर २०१७ रोजी नांदेड येथे स्वत: उपस्थित होते. त्याचबरोर राज्य निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे, कक्ष अधिकारी अतुल जाधव, श्री. संजय सावंत व नायब तहसीलदार प्रदीप सुर्वे हेदेखील उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक १ (डॉ. संजय

पुंडेटकर) यांच्याकडे प्रभाग क्रमांक १,२,३ व ४ ची जबाबदारी होती. त्यापैकी प्रभाग क्र.१,३ व ४ ची मतमोजणी प्रथम करण्यात आली. त्यासाठी एकूण ८ टेबलची व्यवस्था केली होती. टपाली मतपत्रिकांच्या मोजणीकरिता स्वतंत्र व्यवस्था होती. प्रभाग क्रमांक २ च्या मतमोजणीस दुपारी ४.१५ च्या सुमारास सुरूवात करण्यात आली. पहिल्या फेरीत मतदान केंद्र क्रमांक १ ते ८ ची पहिल्यांदा व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठयांद्वारे मतमोजणी केली. नंतर कंट्रोल युनिटद्वारे मतमोजणी केली; परंतु यातील मतदान केंद्र क्रमांक ४ मध्ये व्हीव्हीपॅटचा वापर झालेला नसल्यामुळे तेथे केवळ कंट्रोल युनिटद्वारे मतमोजणी केली. पहिल्या फेरीकरिता सुमारे ४ तासांचा कालावधी लागला. पुढील फेरीत मात्र प्रत्येक टेबलावर एक अतिरिक्त कर्मचारी (३+१) देण्यात आला. त्यामुळे मतमोजणी प्रक्रियेला वेग आला. प्रत्येक फेरीसाठी मतमोजणीची प्रक्रिया पहिल्या फेरीप्रमाणेच पुढे सुरू ठेवण्यात आली.

## आधी निकाल जाहीर करा!

केवळ कंट्रोल युनिटच्या सहाय्याने प्रथम मतमोजणी करावी व निकाल जाहीर करावा. त्यानंतर व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांची मोजणी करावी, अशी आग्रही मागणी मतमोजणीची पहिली फेरी संपल्यानंतर सर्वपक्षीय उमेदवारांकडून करण्यात आली. व्हीव्हीपॅटचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी आणि त्यात आणखी काही सुधारणा असल्यास त्या करणे शक्य व्हावे, या उद्देशाने कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट दोन्ही पद्धतीने सलगपणे मतमोजणी सुरू ठेवण्यात आली. संपूर्ण मतमोजणी १३ ऑक्टोबर २०१७ रोजी पहाटे २ वाजता पूर्ण झाली. निकालासाठी रात्री उशिरापर्यंत उमेदवार आणि कार्यकर्ते मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित होते.

## ईव्हीएम परिपूर्ण व बिनचूक

नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २ मध्ये प्रत्यक्ष झालेले मतदान, व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांची संख्या आणि कंट्रोल युनिटमधील मतांच्या संख्येत कुठलीही तफावत आढळून आली नाही. कुठल्याही मतदारांची किंवा राजकीय पक्ष अथवा उमेदवाराची कुठलीही तक्रार नव्हती. आपले मतदान इच्छित उमेदवारालाच जात असल्याची खात्री पटल्याने अनेक मतदारांनी समाधान व्यक्त केले. यातून इलेट्रॉनिक मतदान यंत्र परिपूर्ण आणि बिनचूक असल्याचे सिद्ध झाले.

व्हीव्हीपॅट हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला (ईव्हीएम) जोडावयाचे अतिरिक्त यंत्र आहे. त्यामुळे अधिक खर्चासोबतच जास्तीची जागा (स्टोरेज), वाहतूक, निकाल जाहीर करण्यासाठीची वेळखाऊ प्रक्रिया, अधिकाधिक मनुष्यबळाची आवश्यकता इ. मुद्देदेखील उपस्थित झाले आहेत. मुळातच ईव्हीएममध्ये कुठल्याही प्रकारे छेडछाड किंवा फेरफार करता येत नसल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. शिवाय आरोप करणारे व्हीव्हीपॅटबाबतही ईव्हीएमसारखेच आरोप करू शकतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेता व्हीव्हीपॅटचीच मुळात आवश्यकता नाही, अशाही प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.

(संदर्भ : 1. Status Paper on Electronic Voting Machine (EVM), Election Commission of India 2. Manual on Elecronic Voting Machine and VVPAT, January 2016, Election Commission of India 3. SEC, Maha., Report - 2017)

# नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांचा मागोवा

गेल्या सहा महिन्यांत राज्यातील विविध जिल्ह्यांमधील १६ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी तीन टप्प्यांत (१०, १३ आणि १७ डिसेंबर २०१७) मतदान झाले. विविध १० नगरपरिषदा नगरपंचायतींमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठीदेखील मतदान झाले.

इगतपुरी, त्रिंबक, जत, हुपरी, किनवट, चिखलदरा, पांढरकवडा, शिंदखेडा, फुलंब्री, सालेकसा, डहाणू, जव्हार, वाडा, नंदुरबार, नवापूर, आणि तळोदा अशा एकूण १६ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पडली. यातील वाडा, हुपरी, फुलंब्री आणि सालेकसा या नवनिर्मित; तर उर्वरित मुदत संपणाऱ्या नगरपरिषदा/ नगरपंचायती आहेत.

## नगराध्यक्षासाठीही थेट निवडणूक

नगरपंचायतींच्या सदस्यांमधून नगराध्यक्षाची निवड केली जात असे; परंतु राज्य शासनाने 'महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार आता नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदासाठीदेखील थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे. त्यासंदर्भात २ नोव्हेंबर २०१७ रोजी अध्यादेश निर्गमित करण्यात आला व त्यानंतर शासनाने १३ नोव्हेंबर २०१७ रोजी याबाबतचे निवडणूक नियमही निर्गमित केले. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक घेण्यास सुरूवात केली आहे. नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक घेण्याची तरतूद सन २०१६ मध्येच करण्यात आली आहे.




इगतपुरी नगरपरिषदेच्या एका मतदान केंद्रावरील मतदारांची रांग

# नगरपरिषदा/ नगरंपचायतींच्या निवडणुकीतील पक्षीय बलाबल (जुलै ते डिसेंबर २०१७)

| अ.क्र. | नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे नाव | एकूण जागा | भारतीय जनता पार्टी | नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी | इंडियन नॅशनल कॉंग्रेस | बहुजन समाज पार्टी | शिवसेना | इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष | राज्य निवडणूक आयोगातील नोंदणीकृत पक्ष | अपक्ष | एकूण | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इगतपुरी | १८ | ४ | ० | ० | ० | १३ | ० | ० | १ | १८ | शिवसेना |
| २ | त्रिंबक | १७ | १४ | ० | ० | ० | २ | ० | ० | १ | १७ | भाजपा |
| ३ | जत | २० | ७ | ६ | ६ | १ | ० | ० | ० | ० | २० | इं.नॅ.कॉं |
| ४ | हुपरी | १८ | ७ | ० | ० | ० | २ | ० | ५ | ४ | १८ | भाजपा |
| ५ | किनवट | १८ | ९ | ६ | २ | ० | ० | ० | ० | १ | १८ | भाजपा |
| ६ | चिखलदरा | १७ | ५ | ० | १२ | ० | ० | ० | ० | ० | १७ | इं.नॅ.कॉं |
| ७ | पांढरकवडा | १९ | ३ | ० | १ | ० | १ | ० | १४ | ० | १९ | प्र.ज.प. |
| ८ | शिंदखेडा | १७ | ९ | ० | ६ | ० | ० | २ | ० | ० | १७ | भाजपा |
| ९ | फुलंब्री | १७ | ११ | ० | ० | ० | ० | १ | ० | ५ | १७ | भाजपा |
| १० | सालेकसा | १७ | ५ | ० | ४ | ० | २ | ० | ० | ६ | १७ | इं.नॅ.कॉं |
| ११ | डहाणू | २५ | १५ | ८ | ० | ० | २ | ० | ० | ० | २५ | भाजपा |
| १२ | जव्हार | १७ | १ | ६ | ० | ० | ९ | ० | ० | १ | १७ | शिवसेना |
| १३ | वाडा | १७ | ६ | १ | २ | ० | ६ | ० | २ | ० | १७ | शिवसेना |
| १४ | नंदुरबार | ३९ | ११ | ० | २४ | ० | ४ | ० | ० | ० | ३९ | इं.नॅ.कॉं |
| १५ | नवापूर | २० | ० | ४ | १४ | ० | १ | ० | ० | १ | २० | इं.नॅ.कॉं |
| १६ | तळोदा | १८ | ११ | ० | ६ | ० | १ | ० | ० | ० | १८ | भाजपा |
| | **एकूण** | **३१४** | **११८** | **२७** | **८१** | **१** | **४३** | **३** | **२१** | **२०** | **३१४** | |

निवडणूक वार्ता
राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# सरपंचपदासाठी प्रथमच थेट निवडणूक

राज्यात सुमारे २८ हजार ग्रामपंचायती आहेत. गेल्या सहामाहीत विविध टप्प्यांत सुमारे ८ हजार ४०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांचे वैशिष्ट्ये म्हणजे सदस्यपदांसोबतच सरपंचपदासाठीदेखील प्रथमच थेट निवडणूक घेण्यात आली.


सरपंचाची निवडणूक ग्रामपंचायतींच्या नवनिर्वाचित सदस्यांमधून केली जात होती; परंतु 'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८' च्या संबंधित कलमात बदल करून सरपंचपदासाठी थेट निवडणूक घेण्याबाबत तरतूद केली आहे. त्यासंदर्भात राज्य शासनाने सर्वप्रथम १९ जुलै २०१७ रोजी अध्यादेश प्रख्यापित केला होता. सदर अध्यादेश २० जानेवारी २०१८ रोजी पुन:प्रख्यापित केला आहे.

कायद्यातील बदलाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने सरपंचपदासाठी थेट निवडणूक घेण्यास सुरूवात केली आहे. आयोगाने थेट सरपंचपदाच्या निवडणुकांसाठी सर्वप्रथम २१ ऑगस्ट २०१७ रोजी १३ जिल्ह्यांतील ११४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यात सदस्य पदाच्या निवडणुकांचाही समावेश होता. त्यानुसार २३ सप्टेंबर २०१७ रोजी प्रत्यक्ष मतदान झाले. २५ सप्टेंबर २०१७ रोजी मतमोजणी झाली. थेट सरपंचपदासाठी सर्वात मोठा निवडणुकीचा टप्पा ऑक्टोबर २०१७ मध्ये पार पडला. यात नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये मुदत संपणाऱ्या ७,५७६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी दोन टप्प्यांत ७ व १६ ऑक्टोबर २०१७ रोजी मतदान झाले.

## तीन ते चार मते देणे आवश्यक

थेट सरपंचपदाच्या निवडणुकांमुळे एका मतदाराला कमीत कमी तीन व जास्तीत जास्त चार मते देणे आवश्यक झाले. एक मत थेट सरपंचपदासाठी; तर अन्य मते आपल्या प्रभागातील सदस्यपदांसाठी द्यावी लागतात. पूर्वीप्रमाणेच सदस्यांसह थेट सरपंचपदाच्या निवडणुकीसाठीदेखील निवडणूक चिन्ह म्हणून मुक्त चिन्हांचा वापर केला जातो. राजकीय पक्षांसाठी आरक्षित असलेल्या चिन्हांचा या निवडणुकीत वापर होत नाही.

**थेट सरपंचपदासाठी प्रथमत: २३ सप्टेंबर २०१७ रोजी निवडणूक झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या :**



# प्रभाग रचनेसाठी उपग्रह छायाचित्रांचा वापर



ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना करताना पारंपरिक पद्धतीऐवजी उपग्रह छायाचित्रांचा यशस्वीरीत्या वापर करण्यात आला. त्यासाठी महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी) या संस्थेची मदत घेण्यात आली. प्रभाग रचनेचे नकाशे साधारणत: हाताने तयार केले जातात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपग्रह छायाचित्रांचा वापर करणे शक्य झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेचे नकाशे अत्यंत सुस्पष्टरीत्या तयार करणे शक्य झाले. ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ८ हजार ४०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी या तंत्रज्ञानाचा प्रथमत: वापर करण्यात आला. त्यामुळे अधिक पारदर्शक पद्धतीने प्रभाग रचना करण्यात आली. परिणामी त्यावरील हरकती व आक्षेपांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले.

## सरपंचपदासाठी फिकी निळी मतपत्रिका

थेट सरपंचपदाच्या मतदानामुळे पहिली मतपत्रिका सरपंचपदाच्या जागेसाठी असते. तिचा रंग फिका निळा तर सदस्यपदाच्या मतपत्रिकांचे रंग मात्र पूर्वीप्रमाणेच आहेत. अनुसूचित जातीच्या राखीव जागेसाठीच्या मतपत्रिकेचा रंग फिका गुलाबी, अनुसूचित जमातीच्या राखीव जागेसाठी फिका हिरवा; तर नागरिकांचा मागासप्रवर्गाच्या जागेसाठीच्या मतपत्रिकेचा रंग फिका पिवळा आहे. सर्वसाधारण जागेसाठीच्या मतपत्रिकेचा रंग पांढरा असतो.

## थेट सरपंचपदासाठी चिन्ह वाटप

ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारांना चिन्ह वाटप करताना सर्वप्रथम सरपंचपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना मुक्त चिन्हाच्या यादीतील अनुक्रमांक १ पासून चिन्ह वाटप करण्यात येते. सरपंचपदाच्या सर्व उमेदवारांना वाटप करण्यात आलेली चिन्हे सदस्य पदाच्या उमेदवारांना वाटप करता येत नाही. थोडक्यात सरपंचपदाच्या उमेदवारांना वाटप केलेली चिन्हे गोठविण्यात येतात. याबाबतच्या सविस्तर कार्यपद्धतीचे सुधारीत आदेश १९ सप्टेंबर २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.


## तर ७ वी उत्तीर्ण आवश्यक

सरपंचपदाच्या पात्रतेसंदर्भातही राज्य शासनाने संबंधित कायद्यात दुरूस्ती केली आहे. त्यानुसार आता सरपंचपदाची उमेदवार असलेली व्यक्ती १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली असल्यास किमान ७ वी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक केले आहे. अशा उमेदवारांना ७ वी इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा ७ व्या इयत्तेशी समतुल्य शैक्षणिक अर्हता असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक असते.

# ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सुधारित खर्च मर्यादा

राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांकरिता २१ ऑगस्ट २०१७ च्या आदेशान्वये सुधारीत खर्च मर्यादा निश्चित केली आहे. सरपंचपदाच्या थेट निवडणुकीतील उमेदवारांसाठी ग्रामपंचायतींच्या सदस्यसंख्येनुसार ५० हजार रुपये ते १ लाख ७५ हजार रुपयांपर्यंत खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे; तसेच सदस्यपदाच्या निवडणुकीतील उमेदवारांसाठी २५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत सुधारीत खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

सरपंचपदाच्या उमेदवारासाठी संपूर्ण ग्रामपंचायत हे प्रचार क्षेत्र असते. यापूर्वी ग्रामपंचायतींच्या सदस्यपदाच्या निवडणुकांसाठी आयोगाच्या ३० जुलै २०११ च्या आदेशानुसार सरसकट २५ हजार रूपये खर्च मर्यादा निश्चित करण्यात आलेली होती. आता सदस्य संख्येनुसार हा बदल करण्यात आला आहे.




## ग्रामपंचायत सदस्य व सरपंचपदाच्या थेट निवडणुकीसाठी खर्च मर्यादा

| सदस्य संख्यानिहाय ग्रामपंचायत | ७ व ९ सदस्य असलेली ग्रामपंचयत | ११ व १३ सदस्य असलेली ग्रामपंचयत | १५ व १७ सदस्य असलेली ग्रामपंचयत |
|---|---|---|---|
| सदस्यपदाच्या उमेदवारांसाठी | २५,००० रु. | ३५,००० रु. | ५०,००० रु. |
| सरपंचपदाच्या उमेदवारांसाठी | ५०,००० रु. | १,००,००० रु. | १,७५,००० रु. |


# ठाणे जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक

राज्य शासनाने ३१ जुलै २०१४ च्या अधिसूचनेन्वये पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे व पालघर अशा दोन स्वतंत्र जिल्ह्यांची निर्मिती केली. त्यामुळे नवनिर्मित ठाणे आणि पालघर जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांसाठी २८ जानेवारी २०१५ रोजी मतदान घेण्यात आले; परंतु २/३ उमेदवार निवडून न आल्याने ठाणे जिल्हा परिषद आणि त्यांतर्गतच्या पंचायत समित्या गठीत होऊ शकल्या नाहीत.

दरम्यानच्या काळात ठाणे जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींचे नगरपंचायतींमध्ये रूपांतर करण्यात आले. परिणामी संबंधित नागरी क्षेत्र वगळून उर्वरित जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणांसाठी राज्य निवडणूक आयोगाने २३ जुलै २०१५ रोजी नव्याने प्रभाग रचना व आरक्षण निश्चितीचा कार्यक्रम जाहीर केला. तथापि, त्याविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या कालावधीत राज्य शासनाने संबंधित कायद्यात दुरूस्ती केली. त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये पुरेशा संख्येने सदस्य निवडून न आल्यास पूर्णपणे नव्याने निवडणुका घेण्याची तरतूद करण्यात आली. या तरतुदीमुळे ठाणे जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या नव्याने निवडणुका घेणे आवश्यक ठरले. ही बाब विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने मुंबई उच्च न्यायालयात सिव्हील प्लिकेशन दाखल केले. त्यावर आणि आधीच्या याचिकांवर उच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन संबंधित कायद्यातील नवीन तरतुदीनुसार हे प्रकरण ७ ऑक्टोबर २०१७ रोजी निकाली काढले. त्यामुळे ठाणे जिल्हा परिषद व त्यांतर्गतच्या पाच पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला.

राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी ११ ऑगस्ट २०१७ रोजी प्रभाग रचना व सदस्य निश्चितीचा कार्यक्रम जाहीर केला. जिल्हा परिषदेचे सदस्य संख्या ५३ इतकी निश्चित करण्यात आली. ४ ऑक्टोबर २०१७ रोजी आरक्षण निश्चिती व प्रभाग रचना अंतिम करण्यात आली. आयोगाने ७ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. जिल्हा परिषदेच्या ५३ जागांसाठी २६६; तर पंचायत समित्यांच्या १०६ जागांसाठी ४४८ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली होती. १३ डिसेंबर २०१७ रोजी मतदान घेण्यात आले. १४ डिसेंबर २०१७ रोजी मतमोजणी पार पडली.

## ठाणे जिल्हा परिषदेमधील पक्षीय बलाबल





## शेलारमध्ये फेरमतदान

भिवंडी तालुक्यात मतदानादरम्यान ३८-शेलार निवडणूक विभागांतर्गतच्या ६८/६ या मतदान केंद्रावरील मतदार यादी ७६ कोलीवली निर्वाचक गणांमध्ये येत असताना ती ७५-शेलार या निर्वाचक गणात समाविष्ट झाल्याचे आढळून

आले. त्यामुळे या मतदान केंद्रावर फेरमतदान घेण्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला. त्या अनुषंगाने ३८-शेलार निवडणूक विभाग, ७५-शेलार निर्वाचक गण आणि ७६ कोलीवली निर्वाचक गणांच्या मतमोजणीला स्थगिती देण्यात आली. तद्नंतर संबंधित मतदान केंद्रावर २६ डिसेंबर २०१७ रोजी फेरमतदान घेण्यात आले.

## ठाणे जिल्ह्यातील पंचायत समित्यांमधील पक्षीय बलाबल



# आंतरराष्ट्रीय मंचाकडून कौतुक

राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य शासन मंच (सीएलजीएफ) हा राष्ट्रकुल मंडळाचा उपक्रम असून त्यामध्ये ५३ देशांचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाहीचे बळकटीकरण करणे, त्यांना तांत्रिक स्वरूपाची मदत करणे आणि अनुभवांची देवाणघेवाण करणे या उद्देशाने सी.एल.जी.एफ. कार्यरत आहे. सी.एल.जी.एफ. तर्फे दर दोन वर्षांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाते. यंदा ही परिषद माल्टाची राजधानी व्हॅलेटा येथे २० ते २४ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत पार पडली. या परिषदेत राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आणि बुबनाळच्या यशोगाथेचे सादरीकरण करण्यासाठी राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांना आमंत्रित करण्यात आले होते.

## आयोगाकडून सादरीकरण

राज्य निवडणूक आयोगाने गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या मदतीने यापूर्वीच संशोधन अहवालही तयार केला आहे; तसेच श्री. सहारिया यांनी स्वत: बुबनाळ येथे भेट देऊन गावकऱ्यांशी चर्चा व पाहणी केली होती. त्याचे श्री. सहारिया यांनी माल्टा येथील परिषदेत सादरीकरण केले. त्याचबरोबर आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबतही सादरीकरण केले. श्री. सहारिया यांच्यासोबत आयोगाचे प्रभारी उपायुक्त अविनाश सणसदेखील उपस्थित होते.

बुबनाळमध्ये साधारणत: सन २००९ पर्यंत जमीन, पाणी व सामाजिक वादांमुळे गावातील विकास कामांना खीळ बसली होती. सन २००९ मध्ये गावातील एका जेष्ठ नागरिकानी एका सुकाणू समितीची स्थापना करून सर्व वादविवाद संपुष्टात आणण्याचे ग्रामस्थांना आवाहन केले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्यामुळे सन २०१० मधील ग्रामपंचायतीच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या.




## आयोगाचे उपक्रम अनुकरणीय

नामनिर्देशनपत्रांसाठी संकेतस्थळाची सुविधा, उमेदवारांच्या आर्थिक व गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या माहितीला व्यापक प्रसिध्दी, चॉटबॉट तंत्रज्ञानाचा वापर, राजकीय पक्षांची रद्द केलेली नोंदणी, मतदार जागृतीला दिलेले लोकचळवळीचे स्वरूप इ. उपक्रम निश्चितच अनुकरणीय असल्याच्या प्रतिक्रिया श्री. सहारिया यांच्या सादरीकरणाप्रसंगी विविध देशांतील प्रतिनिधींनी व्यक्त केल्या. या उपक्रमांचा अभ्यास आणि प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी आम्ही येऊ, अशी इच्छा संयुक्त राष्ट्र महिला, ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमधील लोकल गव्हर्नमेंट इनोव्हेशन युनिट, श्रीलंका आणि मालदीव येथील प्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केली.

सर्व ११ सदस्य पदांवर महिलांना संधी देण्यात यावी; तसेच या सर्व महिला राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील नसाव्यात, असे आवाहन सुकाणू समितीने सन २०१५ मध्ये ग्रामस्थांना केले होते. ग्रामस्थांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे आज ग्रामपंचायतीचा यशस्वीरीत्या कारभार महिला पाहत आहेत. हे कार्य खरोखरच प्रेरणादायी असल्याच्या प्रतिक्रिया विविध देशांतील मान्यवरांनी परिषदेत व्यक्त केल्या.



राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने मुंबई विद्यापीठात नोव्हेंबर २०१७ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. परिषदेच्या समारोप समारंभात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध पुस्तकाचे प्रकाशन झाले. छायाचित्रात डावीकडून आरएससीडीचे श्री. भीम रासकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, श्रमती मानसी फडके, मा. मुख्यमंत्री, श्रीमती रीना फणसेकर, नवी दिल्ली येथील डॉ. जॉर्ज मॅथ्यू, पुणे येथील राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे.





## राज्य निवडणूक आयोग

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.

०२२ २२०४६९०९

sec.mh@gov.in / mahasecpro@gmail.com

https://mahasec.maharashtra.gov.in

https://mahasecnews.blogspot.in

https://www.instagram.com/maharashtrasec

https://www.facebook.com/MaharashtraSEC

https://www.twitter.com/maharashtrasec

https://www.youtube.com/channel/
UCBecPYpVQš1P8-ZqMUlG-1w